RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ९५

दि.०४ ऑगस्ट २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


## वाले इंग्लिश स्कूलमध्ये रक्त तपासणी शिबिर संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ज्योतिबा क्लिनिक लॅबोरेटरी आणि भोलेनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लातूरच्या वतीने रक्त तपासणी शिबिर संपन्न झाली. या शिबिरात शाळेतील विद्यार्थी, शिक्षक यांनी उत्फूर्तपणे सहभाग नोंदवला या तपासणीमध्ये विविध प्रकारच्या रक्त चाचण्या करण्यात आल्या. या शिबिराच्या आयोजकांचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य श्री. भोगडे सर, उपप्राचार्य श्री. बाकलीकर सर, पर्यवेक्षिका श्रीमती भारती मॅडम व सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होता

## पारंपरिक पद्धतीने पुस्तक वाचनाचा आनंद हरवू नये राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**मुंबई/प्रतिनिधी** गिरगाव येथील आर्यन हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक नीलकंठ नामजोशी यांनी आज राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे भेट घेऊन त्यांनी आपण लिहिलेल्या तीन पुस्तकांचा संच भेट दिला.राज्यपाल म्हणाले की, जेव्हा लेखक पुस्तक लिहितो, तेव्हा तो आपल्या विचारांना पंख देतो व जगाच्या ज्ञानात भर घालतो. पुस्तक कधीही मरत नाही. लेखक समाजाला काहीतरी परत देत असतो. एकमेकांना भेटताना पुष्पगुच्छ न देता पुस्तके दिली पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.

महाराष्ट्र ही संत आणि वीरांची भूमी आहे. राज्यात लेखकांची देखील एक मोठी परंपरा आहे. आज आपण ई-पुस्तकांच्या युगात वावरत असलो तरी देखील पारंपरिक पुस्तक वाचनाचे महत्व वेगळे आहे व पुस्तक वाचनाचा आनंद कायम आहे. नव्या युगात पारंपरिक पुस्तक वाचनाचा आनंद हरवू नये, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

नामजोशी यांनी राज्यपालांना 'मोगरा फुलाला दारी' हा कथासंग्रह, 'स्मृतिगंध' हे समाजातील गणमान्य व्यक्तींशी केलेल्या पत्रव्यवहाराचे संकलन असलेले पुस्तक तसेच 'भीमा' ही आदिवासी मुलीच्या कर्तृत्वाची व तिच्या आईच्या त्यागाची कहाणी असलेली कादंबरी भेट दिली. यावेळी नामजोशी यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

## ...तर ते अडचणीत येतील, संजय राऊतांचा मंत्री जयकुमार गोरेंना इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** उद्धव ठाकरे गटाचे नेते आणि राज्यसभा खासदार संजय राऊत आणि राज्याचे ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार यांच्यातील वाद शिगेला पोहोचला आहे. जयकुमार गोरेंविरोधात अवमानकारक व्यक्तव्य केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यानंतर आता संजय राऊतांनी गोरेंविरोधात टीका केली आहे. जयकुमार गोरे यांनी देखील कोण संजय राऊत म्हणत? प्रतिक्रिया देण्यास टाळले होते. यावर आता राऊतांनी जयकुमार गोरेंना दूर राहण्याचा सल्ला देत जवळ फिरकल्यास अडचणीत याल, असा इशारा दिला आहे.

गुन्ह्याबाबत माहिती नाही - राऊत

सोलापूरमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत राऊतांना विचारण्यात आले. ''राजकीय कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल होत असतात, कशासाठी गुन्हा दाखल झालाय? मला कल्पना नाही. सरकारमधील लोकं स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य मानण्यास तयार नाहीत. त्यामुळे शब्दांनी अपशब्दाचे अवरण चढवून गुन्हे दाखल केले जातात. किंती गुन्हे दाखल करणार? आंदोलकांवर गुन्हे दाखल केले म्हणून ते घाबरले?,'' असा सवाल राऊतांनी उपस्थित केला. संजय राऊतांनी रविवारी जयकुमार गोरे यांच्या अटकेच्या बातमीचा एक फोटो सोशल मीडियावरुन शेअर करत टीका केली होती. याबाबतही राऊतांना विचारण्यात आले.

सत्तेत असल्यामुळे दाखल केले जात असल्याचा आरोप

''जयकुमार गोरे यांनी उद्धव ठाकरे यांच्याबाबत केलेले वक्तव्य सभ्येत्याच्या कोणत्या चौकटीत बसते? उद्धव ठाकरे राज्याचे माजी मुख्यमंत्री आहेत. ते बाळासाहेब ठाकरे यांचे सुपुत्र आहेत, शिवसेनाप्रमुख आहेत. तुम्ही त्यांच्याबद्दल काहीही वक्तव्य करायचं आणि आम्ही त्याला प्रत्युत्तर दिल्यानंतर तुम्ही गुन्हे दाखल करायचं याला हुकूमशाही म्हणतात.

# लातूरमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळा उभारणीसाठी सर्व समाजातील महिलांनी आयुक्त, महापौरांना निवेदनाद्वारे केली मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, लातूर येथील विद्यमान क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याशेजारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, या ऐतिहासिक आणि न्याय्य मागणीसाठी आज लातूर महानगरपालिका आयुक्त, महापौर, मनपा नगरसेवक यांना सर्व समाजातील महिलांच्या वतीने स्वाक्षरीयुक्त निवेदन सादर करण्यात आले.





या निवेदनावर शहरातील विविध समाजघटकांतील महिला, सामाजिक कार्यकर्त्या, शिक्षिका, विद्यार्थिनी, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच समतावादी नागरिक यांच्या मोठ्या संख्येने स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. निवेदन देण्याच्या वेळी मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते. त्यामुळे या मागणीला व्यापक लोकसमर्थन लाभल्याचे चित्र पाहायला मिळाले.

निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की, भारतीय समाजात स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नाकारला जात होता.

महिलांना अज्ञानाच्या अंधारात ठेवण्याची परंपरा असताना महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा विचार मांडला आणि त्या विचाराला प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचे धाडसी व ऐतिहासिक कार्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. इ.स. १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू करून त्या देशाच्या पहिल्या महिला मुख्याध्यापिका ठरल्या. समाजातील कट्टर विरोध, दगडफेक, शेणफेक, अपमान आणि अमानुष छळ सहन करूनही सावित्रीबाईंनी शिक्षणाचा दीप विझू दिला नाही. अंगावर शेणफेक होईल म्हणून त्या अतिरिक्त साडी घेऊन घराबाहेर पडत असत, परंतु मुलींच्या शिक्षणाचा संकल्प त्यांनी कधीही सोडला नाही. हा इतिहास केवळ एका शिक्षिकेचा नसून भारतीय स्त्रीमुक्ती, सामाजिक समता आणि मानवी मूल्यांच्या पहिल्या सामाजिक क्रांतीचा इतिहास असल्याचे निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि मानवमुक्तीचे विचार समाजात रुजविले. विधवा पुनर्विवाह, अस्पृश्यता निर्मूलन, शेतकरी व कष्टकरी समाजाच्या प्रश्नांवर त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला.

या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याचे महान कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले. स्त्रीशिक्षणाबरोबरच विधवा महिला, अनाथ बालके, शोषित आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी आयुष्य समर्पित केले. प्लेगच्या साथीमध्ये रुग्णांची सेवा करताना त्यांना संसर्ग झाला आणि १० मार्च १८९७ रोजी त्या सेवाकार्यातच वीरमरण पावल्या. त्यामुळे सावित्रीबाईंचे संपूर्ण जीवन हे त्याग, सेवा, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रेरणादायी प्रतीक मानले जाते.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले हे भारतीय सामाजिक क्रांतीचे दोन अविभाज्य स्तंभ आहेत. ज्योतिरावांचे विचार आणि सावित्रीबाईंचे कार्य हे एकमेकांना पूरक आहे. त्यामुळे एका महापुरुषाचा पूर्णाकृती पुतळा उभारून दुसऱ्या महान समाजक्रांतिकारक व्यक्तिमत्त्वाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे इतिहासाचे अपूर्ण दर्शन घडविणे होय. समाजातील स्त्री-सन्मान, शिक्षण आणि समानतेच्या मूल्यांचा गौरव करण्यासाठी दोघांचेही स्मरण समान सन्मानाने होणे आवश्यक असल्याचे मत निवेदनातून व्यक्त करण्यात आले.

लातूर शहरातील संपूर्ण परिवर्तनवादी महिला, सामाजिक कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटना, शिक्षक, विद्यार्थी, बहुजन समाज आणि समतावादी नागरिकांची ही मागणी असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले.

या मागणीमागे कोणताही राजकीय अथवा वैयक्तिक हेतू नसून इतिहासाला न्याय देणे, स्त्रीशक्तीचा सन्मान करणे आणि भावी पिढ्यांना सामाजिक परिवर्तनाचा प्रेरणादायी इतिहास समजावा हा एकमेव उद्देश असल्याचेही नमूद करण्यात आले. महानगरपालिकेने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, लातूर येथील मिनी मार्केटमधील फुलांच्या दुकानाच्या कोपऱ्याजवळ विद्यमान क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याशेजारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा भव्य, पूर्णाकृती व सुयोग्य पुतळा तातडीने उभारण्यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी उपस्थित महिलांनी, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले हे भारतीय समाजपरिवर्तनाचे समान धागे आहेत. एका महान क्रांतिकारकाचा गौरव करून दुसऱ्याच्या कार्याकडे दुर्लक्ष होऊ नये. भावी पिढ्यांना समता, शिक्षण आणि स्त्री-सन्मानाचा इतिहास प्रेरणादायी स्वरूपात समजावा, यासाठी लातूर महानगरपालिकेने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या ऐतिहासिक मागणीमुळे लातूर शहरात सामाजिक न्याय, स्त्री-सन्मान आणि परिवर्तनवादी विचारांच्या जतनासंदर्भात नव्याने चर्चा सुरू झाली असून, महानगरपालिका प्रशासन या मागणीवर कोणता निर्णय घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

या निवेदना वर आशा सुशील चिकटे, शोभाताई सोनकांबळे, सुजाता आजनिकर, निर्मला थोटे, शशिकला सुरवसे, निर्मला गौरकर, सरिता बनसोडे, मयुरी आल्टे, प्रणिता वाघमारे,मंगल कांबळे, कविता कदम,प्रतिभा कांबळे,शामल कांबळे, ललिता गायकवाड,प्रेमीला आपटे, शकुंतला नेत्रागावकर, बेबी कांबळे, मीना कदम,सुशील चिकटे, उदय सोनवणे, पांडुरंग अंबुलगेकर, मुकुंद वाघमारे, प्रा. विश्वनाथ आल्टे,ज्योतीराम लामतुरे, मिलिंद धावारे ई. सह शेकडो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या या निवेदना वर आहेत.

## खरीप पीकस्पर्धा जाहीर; अर्जाची मुदत १० ऑगस्ट

# अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी आणि प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभागामार्फतखरीप हंगाम २०२६-२७साठी राज्यांतर्गत पीकस्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. यंदापासून प्रथमच अर्ज प्रक्रिया स्वतंत्रऑनलाइन पोर्टलद्वारेराबविण्यात येणार आहे.अर्ज करण्याची अंतिम मुदत१० ऑगस्ट २०२६आहे.



शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या http://krishi.maharashtra.gov.in संकेतस्थळावरीलपीक स्पर्धा नोंदणीटॅबवर जाऊन ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारीदिलीप जाधवयांनी केले आहे.

पीकस्पर्धेअंतर्गत भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या११ खरीप पिकांचासमावेश करण्यात आला आहे. स्पर्धा तालुका, जिल्हा आणि राज्य या तीन स्तरांवर होणार आहे. तालुकास्तरावरील उत्पादकतेच्या आधारे पुढील स्तरासाठी विजेत्यांची निवड केली जाईल.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांच्या नावावर जमीन असणे व ती स्वतः कसत असणे आवश्यक आहे. एका शेतकऱ्याला एकापेक्षा अधिक पिकांसाठी स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. भातासाठी किमान२० गुंठे, तर इतर पिकांसाठी गुंठे सलग क्षेत्रअसणे बंधनकारक आहे.अर्जासोबतफार्मर आयडी, प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, आदिवासी गटासाठी जात प्रमाणपत्र, बँक खाते तपशील व पासबुकच्या पहिल्या पानाची प्रतजोडावी लागणार आहे.

सर्वसाधारण गटासाठी प्रवेश शुल्क रुपये, तर आदिवासी गटासाठी रुपयेनिश्चित करण्यात आले आहे.पीकस्पर्धेतील विजेत्यांना तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर रोख बक्षिसे दिली जाणार आहेत. तालुकास्तरावर पहिले५ हजार, दुसरे३ हजारआणि तिसरे२ हजार रुपये; जिल्हास्तरावर पहिले१० हजार, दुसरे७ हजारआणि तिसरे५ हजार रुपये; तर राज्यस्तरावर पहिले५० हजार, दुसरे४० हजारआणि तिसरे३० हजार रुपयेबक्षीस दिले जाणार आहे.याबाबत अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कृषी विभागाने कळवले आहे.

## ४ ऑगस्टला शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीचे ७ हजार कोटी जमा होणार

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्य सरकारच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या सुमारे १६ लाख ९४ हजार शेतकऱ्यांच्या पीक कर्ज खात्यात मंगळवारी, ४ ऑगस्ट रोजी एकाच वेळी सात हजार कोटी रुपये जमा केले जाणार आहेत. सहकार विभागाच्या या निर्णयामुळे थकीत कर्जदारांना मोठा दिलासा मिळणार असून त्यांचा पुन्हा नवीन पीक कर्ज घेण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

राज्य सरकारने ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी जाहीर केली आहे. या योजनेनुसार पहिल्या टप्प्यात दोन लाखांच्या आतील कर्जदार शेतकऱ्यांची यादी प्राप्तिकर विभागाकडे छाननीसाठी पाठवण्यात आली होती. यामध्ये प्राप्तिकर भरणारे ९४ हजार शेतकरी आढळून आल्याने त्यांना कर्जमाफीसाठी अपात्र ठरवण्यात आले आहे. तर उर्वरित १६ लाख ९४ हजार पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली असून, या शेतकऱ्यांच्या कर्ज खात्याचे आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच रक्कम वर्ग करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन निधी देण्यात येत आहे. तसेच दोन लाखांपेक्षा अधिक कर्ज थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील उर्वरित रक्कम बँकेत भरल्यानंतर, 'एकवेळ समझोता' (वन टाईम सेटलमेंट) योजनेअंतर्गत त्यांच्या खात्यातही सरकार २ लाख रुपये जमा करणार आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पात्र शेतकऱ्यांनी काळजी करू नये असे सांगत, या प्रक्रियेमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# लातुरात बालनाट्य दिन जल्लोषात साजरा; इतिहास महाराष्ट्राचा स्पर्धा संपन्न, विजेत्यांना अंतिम फेरीत संधी

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटक संस्था असणाऱ्या बालरंगभूमी परिषद शाखा लातूरच्या वतीने बालनाट्य दिवसाचे औचित्य साधून २ ऑगस्ट रोजी इतिहास महाराष्ट्राचा ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

प्रतीवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या या स्पर्धेसाठी एक ऐतिहासिक चरित्रात्मक विषय ठरवण्यात येतो. या अनुषंगाने यंदा ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य'' या संकल्पनेवर आधारित एकल आणि सामूहिक स्पर्धा निश्चय संस्कृत क्लासेस, लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धा समारंभाचे उदघाट्न रंगकर्मी, अखिल भारतीय नाट्य परिषद महानगर शाखेचे अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक ॲड. शैलेश गोजमगुंडे यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून नाट्य समीक्षक तथा मुक्त पत्रकार अनिल पुरी, रंगकर्मी ॲड. हंसराज साळुंके, रंगकर्मी राजीव गड्डीमे, बालरंगभूमी परिषद लातूर शाखेचे अध्यक्ष रणजित आचार्य व स्पर्धेचे परीक्षक प्रा. डॉ. साईनाथ उमाटे, धनंजय नाकाडे हे उपस्थित होते

यावेळी बोलताना ॲड. शैलेश गोजमगुंडे यांनी बालनाट्य दिवसाचे महत्व उपस्थितांना समजून सांगितले शिवाय बालरंगभूमी ही बालकांच्या सांस्कृतिक जडण घडणीसाठी सदैव तत्पर असल्याचे सांगितले. अत्यंत जल्लोषात पार पडलेल्या या स्पर्धेत नृत्य, नाट्य व संगीताच्या आधारावर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी वरील सादरीकरण करणे आवश्यक होते.

तब्बल १५० बालकलाकार सहभागी झालेल्या या स्पर्धेत एकल बाल गटात ( वय ५ ते १० वर्षे ) सर्वोत्कृष्ठ- रियांशी होणकर, उत्कृष्ट- अक्षरा आंधळे, उत्तम- श्रेया दुणगावे तर एकल मोठ्या गटात ( वय ११ ते १५ वर्षे ) सर्वोत्कृष्ठ- गार्गी जाधव, उत्कृष्ट- नम्रता लुल्ले, उत्तम- आदिश्री कासले आणि सामूहिक गट स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ठ - विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुल, उत्कृष्ट- ए पी डान्स अकॅडमी, उत्तम- शारदा इंटरनॅशनल स्कुल हे या स्पर्धेतील विजेते ठरले. सर्व विजेत्या ठरलेल्या स्पर्धकांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

०९ ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगर येथे होणाऱ्या अंतिम साठी लातूर मधून विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुल, गार्गी नवलाजी जाधव आणि रियांशी होणकर यांची निवड झाली..

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा प्रमुख महेश बिडवे यांनी केले व सूत्रसंचालन तेजश्री घवले पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आभार बालरंगभूमी परिषद लातूर शाखेचे अध्यक्ष रणजित आचार्य यांनी मानले. तसेच परीक्षक म्हणून डॉ. साईनाथ उमाटे व धनंजय नाकाडे यांनी काम पाहिले.



या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी बालरंगभूमी परिषदेचे अध्यक्ष रणजित आचार्य, स्पर्धा प्रमुख महेश बिडवे, प्रमुख कार्यवाह प्रा. नवलाजी जाधव, कार्याध्यक्ष मयूर राजापुरे, कोषध्यक्ष रवि अघाव, विशाल वाटवडे, हिरा वेदपाठक, वनिता गोजमगुंडे, महेश पवार, प्रिती ठाकूर, तेजश्री घवले पाटील, भीम दूनगावे, वसुधा पाटील, रविकिरण सावंत, ऋतुराज सुरवसे, आर्यन गिरवलकर, कृष्णा शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

## संपादकीय...

### डिजिटल व्यापाराचे वळण

जागतिक व्यापार संघटनेच्या ई-कॉमर्स शुल्कमाफीला मुदतवाढ मिळाली नाही. परिणामी, सीमा शुल्काविना डिजिटल व्यापार करण्याची तीन दशकांची सवलत संपली आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) एका महत्त्वाच्या तात्पुरत्या तरतुदीमुळे गेली जवळपास तीन दशके सॉफ्टवेअर, क्लाऊडआधारित सेवा आणि डिजिटल आशय यांचा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होणारा व्यापार सीमा शुल्काविना सुरू होता. १९९८ मध्ये प्रथम स्वीकारली आणि त्यानंतर तब्बल ११ वेळा मुदतवाढ मिळालेली ही 'ई-कॉमर्स मोरॅटोरियम' आता संपुष्टात आली आहे. कॅमेरूनमधील याऊंदे येथे मार्च महिन्यात झालेल्या 'डब्ल्यूटीओ'च्या १४ व्या मंत्रिस्तरीय परिषदेत या तरतुदीला पुढे सुरू ठेवण्यावर सदस्य देशांमध्ये एकमत होऊ शकले नाही. त्यामुळे ही व्यवस्था संपुष्टात आली. तूर्तास बहुतांश देश तत्काळ शुल्क आकारणी सुरू करतील, अशी शक्यता कमी आहे. मात्र, जागतिक व्यापार आधीच भू-राजकीय तणावांच्या दबावाखाली असताना या व्यवस्थेच्या समाप्तीमुळे जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेत एका अत्यंत नाजूक टप्प्यावर अनिश्र्चितता वाढली आहे. भारत या शुल्कमाफीला मुदतवाढ देण्याच्या विरोधात होता. विकसनशील अर्थव्यवस्थांचे यामुळे महसुली नुकसान होत असल्याचा भारताचा युक्तिवाद होता. संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार व विकास परिषदेने केलेल्या अभ्यासानुसार, भारतासारखे विकसनशील देश या शुल्कमाफीमुळे दरवर्षी अंदाजे २५ अब्ज डॉलर्स एवढा संभाव्य महसूल गमावत आहेत. मात्र, असे असले तरी भारताने आपल्या व्यापक आणि दीर्घकालीन हितसंबंधांचा विचार करणे आवश्यक आहे; कारण आकडेवारी वेगळेच चित्र दाखवते. 'डब्ल्यूटीओ'च्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये भारताने डिजिटल पद्धतीने पुरवल्या जाणार्या सेवांच्या सर्वात मोठ्या निर्यातदार देशांमध्ये आपले स्थान निर्माण केले. भारतातून या सेवांची निर्यात १८ टक्क्यांनी वाढून तब्बल ३२८ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली. विशेष म्हणजे, डिजिटल सेवांच्या निर्यातीत भारताने २००५ पासून सातत्याने व्यापार अधिशेष राखला आहे. यावरून सॉफ्टवेअर, वित्तीय तंत्रज्ञान, संशोधन व विकास आणि क्लाऊड सक्षम निर्यात या क्षेत्रांचे भारताच्या अर्थव्यवस्थेतील वाढते महत्त्व स्पष्ट होते. आज भारतात २१०० हून अधिक जागतिक क्षमता केंद्रे (ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स - जीसीसी) आहेत, ज्यांच्याद्वारे दरवर्षी सुमारे शंभर अब्ज डॉलर्सचे उत्पन्न मिळते. ही केंद्रे माहिती-तंत्रज्ञान, वित्त, अभियांत्रिकी, एआय आणि संशोधन यासारख्या क्षेत्रांत बहुराष्ट्रीय कंपन्यांना सेवा पुरवतात. या व्यवसायांचे कामकाज पूर्णतः सीमेपलीकडील अबाधित डिजिटल प्रवाहावर अवलंबून आहे. म्हणजेच डेटा, सॉफ्टवेअर व सेवा यांची देवाण-घेवाण, हाच या केंद्रांच्या अस्तित्वाचा पाया आहे. जर डिजिटल व्यापाराचे नियम विविध देशांनुसार विखंडित झाले, तर याचे अनेक प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. मुख्य म्हणजे, वेगवेगळ्या देशांचे वेगवेगळे शुल्क व नियम पाळण्यासाठी कंपन्यांना अतिरिक्त खर्च करावा लागेल. भारताने शुल्क लावल्यास इतर व्यापारी भागीदार देशदेखील प्रत्युत्तर म्हणून शुल्क आकारू शकतात. त्याचा फटका भारताच्या निर्यातीला बसेल. भारतीय सेवा क्षेत्रातील हे स्थित्यंतर आणि त्याचे व्यापक स्वरूप पाहता, परिषदेत भारताने भूमिका का बदलली, हे स्पष्ट होते. भारताने शुल्कमाफी सन २०३० पर्यंत वाढवण्याच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला. हा बदल केवळ धोरणात्मक नसून, तो थेट आर्थिक वास्तवाचे प्रतिबिंब आहे. डिजिटल निर्यातीच्या विस्तारातून मिळणारे दीर्घकालीन फायदे हे सीमा शुल्क लादून मिळू शकणार्या तुलनेने अल्प महसुलापेक्षा अधिक मोठे आहेत. 'डब्ल्यूटीओ'ची शुल्कमाफी संपल्यामुळे सदस्य देशांना इलेक्ट्रॉनिक निर्यातीवर सीमा शुल्क लादण्याचा पर्याय जरी उपलब्ध झाला असला, तरी भारताने अशी पावले उचलण्यापासून दूर राहणेच योग्य ठरेल. कारण, 'इलेक्ट्रॉनिक ट्रान्समिशन' म्हणजे नेमके काय आणि ही शुल्कमाफी केवळ प्रसारणाच्या माध्यमाला लागू आहे की डिजिटल आशयालाही, याबाबत 'डब्ल्यूटीओ'मध्ये एकमत होऊ शकले नाही. भौतिक वस्तूंप्रमाणे डिजिटल आशय सीमा शुल्क तपासणी चौक्यांमधून जात नाही. त्यामुळे त्याचा उगम, सीमा शुल्क मूल्य आणि आयातीचा नेमका बिंदू निश्र्चित करणे कायदेशीर आणि तांत्रिकदृष्ट्या अत्यंत क्लिष्ट काम ठरेल. अशा अस्पष्ट व्याख्यांच्या आधारे शुल्क आकारणी सुरू केल्यास वाद, कायदेशीर पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. 'डब्ल्यूटीओ'ची डिजिटल शुल्कमाफी संपुष्टात येणे हे जागतिक व्यापार व्यवस्थेतील एक महत्त्वाचे वळण आहे. अल्पकालीन महसुलाच्या आकर्षणापेक्षा भारताने दीर्घकालीन डिजिटल निर्यात क्षमतेला, जागतिक गुंतवणूकदारांच्या विश्र्वासाला आणि व्यापारी भागीदारांशी असलेल्या संबंधांना प्राधान्य देणे हिताचे ठरेल. जागतिक डिजिटल व्यापाराचे भविष्यातील नियम ठरवणार्या मंचांवर सक्रिय व निर्णायक भूमिका घेणे, हीच भारतासाठी खरी दीर्घकालीन रणनीती असू शकते

# स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षक व पालकांनी योग्य दिशा व मार्गदर्शन करण्याची गरज

## उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी रोहिणी नऱ्हे यांचे प्रतिपादन




दयानंद शिक्षण संस्था व दयानंद विज्ञान महाविद्यालय महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय असून या महाविद्यालयात इयत्ता अकरावीत पंधराशेपेक्षा जास्त प्रवेश झाली आहेत ही प्रशासकीय बाब आहे.मी दयानंदचीच विद्यार्थीनी असून येथेच माझी जडणघडण झाली.सुजाण पालक व शिक्षकांनी अकरावी प्रवेशित विद्यार्थ्यांचे वय लक्षात घेता त्यांच्या शारीरिक व मानसिक बदलांचा विचार करून त्यांचा विश्वास संपादन करीत व मित्रत्वाचे नाते निर्माण करीत त्यांच्यावर योग्य संस्कार व त्यांच्यात सकारात्मक भावना निर्माण केली पाहिजे.प्रत्येक विद्यार्थ्यांनी शिस्त, प्लॅनिंग, भरपूर अभ्यास, योग्य संगत, व्यसनापासून दूर राहणे, तणावमुक्त जीवन जगणे व मोबाईलपासून दूर राहणे ही आठ सूत्रे जर पाळली तर प्रत्येक विद्यार्थी निश्चितच जीवनात यशस्वी होतील. कठोर परिश्रम,मेहनत, भरपूर अभ्यास करण्यावर प्रत्येक विद्यार्थ्यांनी भर द्यावा.स्पर्धेच्या युगात पालक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य दिशा व मार्गदर्शन केले तर प्रत्येक विद्यार्थी निश्चितच यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचेल, एक पालक व अधिकारी म्हणून मला ठाम विश्वास आहे, असे प्रतिपादन लातूरच्या उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी रोहिणी नऱ्हे (विरोळे) यांनी केले.

लातूर येथील गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा असलेल्या दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने दि.०२ ऑगस्ट २०२६ रोजी ११ वी प्रवेशित विद्यार्थी- पालक व शिक्षक मेळाव्याचे आयोजन दयानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात करण्यात आलेले होते.या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी होते.यावेळी त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या.याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष संजय बोरा, सीईटी सेलचे चेअरमन डॉ.चेतन सारडा, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, सेल्फ फायनान्सचे प्रिन्सिपल प्रा.अनिलकुमार माळी,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर, नीट समन्वयक डॉ.कोमल गोमारे, सीईटी समन्वयक प्रा.कविता जाधव, जेईई समन्वयक प्रा.रवी कुमार,प्रा.बळवंत सूर्यवंशी,पालक प्रतिनिधी धनाजी दोरवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**विद्यार्थ्यांच्या यशातच संस्थेचे यश - सचिव रमेश बियाणी**

दयानंद शिक्षण संस्थेत प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल घडवण्यासाठी शिक्षक, प्रत्येक कर्मचारी व संस्था नेहमी प्रयत्नशील असते. संस्थेत विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीसुविधा उपलब्ध आहेत.योग्य शिस्त,संस्कार विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता व गुणवत्ता वाढीसाठी येथे पोषक वातावरण आहे. पालकांनीही विद्यार्थ्यांचा अभ्यास व त्याची संगत याकडे नेहमी लक्ष दिले पाहिजे.जीवनात कोणतेही ताणतणाव न घेता आनंदी जीवन जगत विद्यार्थी, पालकांनी व शिक्षकांनी मार्गक्रमण केले पाहिजे.विद्यार्थ्यांच्या यशातच संस्थेचे यश आहे, असे प्रतिपादन अध्यक्षीय समारोप करताना दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांनी केले.

तसेच डॉ.चेतन सारडा यांनी पालकांनी विद्यार्थ्यांकडून घरांमध्ये योग्य अभ्यास, मेहनत करून घेऊन त्यांना शिस्त व योग्य संस्कार देऊन त्यांची मोठी स्वप्नं साकार केली पाहिजेत. त्यांच्या शारीरिक, मानसिक बदलांचाही विचार केला पाहिजे,शिक्षकही आपली भूमिका चोख बजावतात, असेही त्यांनी सांगितले.प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी केले तर आभार प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी मानले.प्रमुख पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी केले.यावेळी डॉ.कोमल गोमारे यांनी नीट, प्रा.रवी कुमार यांनी जेईई आणि प्रा.कविता जाधव यांनी सीईटी संदर्भात मार्गदर्शन केले व शालांत व जेईई, नीट,सीईटी गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कपिल मामनकर, श्रावणी सरवदे या विद्यार्थ्यांनी व घेवारे या पालकांनी मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# सरकारचे ईपीएस-९५ पेंशन धारकांवरील दुर्लक्ष म्हणजे जेष्ठ नागरिकांची खुली थट्टाच!

२०१४ पासुन ईपीएस पेंशन धारक फक्त जगण्याइतकी इतकी पेन्शनची मागणी करीत आहे.परंतु सरकार प्रत्येक अधिवेशनात डोळे बंद करून फक्त तमाशा पहात आहे.जेष्ठ नागरिक ईपीएस पेंशन धारक कमीत कमी ७५०० पेंशन व महागाई भत्ता मिळावा यासाठी वृध्दापकाळात सुध्दा संघर्ष करीत आहे.परंतु सरकारच्या नाकावरील माशी सुद्धा उडतांना दिसत नाही हे जेष्ठांच्या प्रती दुर्भाग्य म्हणावे लागेल.सरकार निवडणुकीच्या काळात मतदारांना लॉलीपॉप देवून अनेक मोफत योजना अंमलात आणते.परंतु देशाचा शिल्पकार कामगार वर्ग फक्त जगण्याइतकी पेन्शनची मागणी करते तेव्हा सरकार प्रत्येक अधिवेशनात पाठ फिरवितांना दिसते.देशात वाढती महागाई,वाढता औषधोपचार, वाढते कर आणि वाढत्या प्रदूषणामुळे वृध्दापकाळातील ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला असुन ग्रस्त आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही.त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही ईपीएस पेंशन धारक आनंदाने करू. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री ,खासदार,आमदार, प्रशासकीय विभाग यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यंत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या पावसाळी अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील करोडो वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही पावसाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दु:ख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही. ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे. ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या पावसाळी अधिवेशनात दिसून आले.आज देशातील करोडो ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.सरकार महागाई वाढवीते तेव्हा कोणाचाही विचार न करता भरमसाठ महागाई वाढविते आणि ईपीएस पेंशन धारक फक्त ७५०० रूपये पेन्शन मागते तेव्हा सरकार पाठ फिरविते ही कुठली लोकशाही म्हणावी.आज सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स,वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली?पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते आहे.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या पावसाळी अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दु:खद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस- १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत करोडो ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षांच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या ''म्हारपणाची शीदोरी'' आहे. त्यामुळे पेन्शन हे ''जीवन-मरणाचे'' साधन सुध्दा आहे. याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा. आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४५ कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी करोडो पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा ''अरबो रूपया'' सरकारजवळ आहे हा पैसा सरकार ''लोकप्रतिनिधीच्या'' पगारासाठी,पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना ''भिक'' दील्यासारखी पेंशन देत आहे. ही ''लोकशाहीला'' काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दु:ख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे. राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू असतात व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढले की राजकीय पुढाऱ्यांचे पगार व पेंशन वाढतात याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही ''देर आज दुरूस्त आए'' ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले.तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. पावसाळी अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते.कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न करोडो पेन्शन धारकांपुढे उपस्थित होतो. त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की ''आपलाच पैसा आपणच चोर''. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की ''जगावे की मरावे''अशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत. त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस-९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल.पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा ''शिल्पकार'' आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.केंद्र सरकारने ज्याप्रमाणे आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी दिली.त्याचप्रमाणे ईपीएस-९५ पेंशन बद्दल सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे. मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत.परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत पक्ष-विपक्षाच्या अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दाला गांभीर्याने घेऊन कमीत कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या करोडो पेंशन धारकांना आहे.सरकारला यावर काहीच निर्णय घ्यायचा नसेल तर ईपीएस पेंशन धारकांना सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी याचेही आम्ही स्वागत करू.जय हिंद!जय भारत.



लेखक.
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# अण्णाभाऊ साठे, बाबासाहेब आंबेडकरांच्या वारसदारांनी आपापसातील भांडणे सोडली पाहिजेत : बी. बी. मेश्राम

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १८२ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त ''जग बदल घालुनी घाव, मज सांगून गेले भीमराव'' या विषयावर १८२ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा साकेतनगर येथील संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी ज्या सामाजिक परिवर्तनासाठी संपूर्ण आयुष्य संघर्षमय केले, त्याच ध्येयपूर्तीसाठी कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. समाजातील अंतर्गत मतभेद आणि वैचारिक विखुरलेपणामुळे परिवर्तनवादी चळवळीची ताकद कमी होत असून अण्णाभाऊ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसदारांनी परस्परांतील भांडणे थांबवून एकत्र येणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



देशातील शिक्षणव्यवस्थेतील असमानता आणि स्पर्धा परीक्षांमधील गैरव्यवहारावर भाष्य करताना त्यांनी पेपरफुटीच्या घटनांवर केवळ संबंधित मंत्र्यांचा राजीनामा हा उपाय नसून शिक्षणव्यवस्थेची मानसिकता आणि धोरणे बदलणे अधिक आवश्यक असल्याचे सांगितले. देशातील सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळण्यासाठी राज्य मंडळ, सीबीएसई आणि आयसीएसई असा भेद न करता केजी ते पीजी एकसमान राष्ट्रीय अभ्यासक्रम लागू करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. गुणवत्तापूर्ण, रोजगाराभिमुख आणि जीवनमूल्ये विकसित करणारे शिक्षण दिल्यासच सक्षम नागरिक घडतील, असेही ते म्हणाले. याचबरोबर देशातील खाजगी शिक्षणसंस्थांचे राष्ट्रीयीकरण करण्याची मागणीही त्यांनी केली.

आरक्षणाच्या इतिहासाचा संदर्भ देताना मेश्राम यांनी सांगितले की, सामाजिक न्यायाच्या प्रश्नाकडे दूरदृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे. समाजातील विविध घटकांनी इतिहासातून धडे घेऊन परस्पर संघर्षाऐवजी एकात्मतेच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे. उच्च शिक्षणातून समज, विवेक आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होत नसेल, तर त्या शिक्षणाचा समाजाला अपेक्षित लाभ मिळत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

उद्घाटनपर भाषणात जिल्हा व सत्र न्यायालयाचे ॲड. अविनाश थिट्टे यांनी अण्णाभाऊ साठे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत व्यवस्थेला दिलेले वैचारिक आव्हान अधोरेखित केले. युवकांचे भविष्य अंधकारमय झाल्याने आत्महत्येसारख्या घटना घडत असल्याची बाब समाजासाठी चिंताजनक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख वक्ते ॲड. डी. व्ही. खिल्लारे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामागील सामाजिक एकतेचा संदेश स्पष्ट करताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील लाभार्थी घटकांनी वंचित समाजाच्या उन्नतीसाठी अधिक सक्रिय योगदान देण्याची गरज व्यक्त केली.

ॲड. सुनिलकुमार नागवंश यांनी अण्णाभाऊंच्या दीड दिवसांच्या औपचारिक शिक्षणातून घडलेल्या असामान्य वैचारिक प्रवासाचा उल्लेख करत, ''ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नव्हे तर श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे,'' या त्यांच्या विचाराची आजही प्रासंगिकता अधोरेखित केली.

उद्योजक एम. ए. बागुल यांनी अण्णाभाऊंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात परिवर्तनाचा मार्ग शोधला असल्याचे सांगितले. अन्यायाविरुद्ध न्यायाचा घाव घालण्यासाठी वैचारिक प्रेरणाच सर्वात प्रभावी शक्ती असल्याचे त्यांनी नमूद केले. वरिष्ठ संशोधन अधिकारी चंदा मगर यांनी अण्णाभाऊंच्या अल्पशिक्षणातून घडलेल्या असामान्य कार्याचा संदर्भ देत, आजच्या उच्चशिक्षित समाजाने आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता व्यक्त केली. देशातील अनेक सामाजिक समस्या शिक्षणव्यवस्थेशी निगडित असल्याचे त्यांनी सांगितले.

विलास सुखदान यांनी मोबाईलचा सुयोग्य वापर ज्ञानवृद्धीसाठी उपयुक्त ठरू शकतो, मात्र त्याचा दुरुपयोग समाजासाठी घातक असल्याचे सांगितले. उद्योजक शशिकांत काळे यांनी महापुरुषांना जातीच्या चौकटीत मर्यादित न ठेवता त्यांच्या सार्वत्रिक विचारांचा स्वीकार करण्याचे आवाहन केले.

डॉ. कल्पना गंगावणे यांनी अण्णाभाऊ साठे यांनी औपचारिक शैक्षणिक वारसा नसतानाही साहित्याला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनविल्याचे सांगितले. ॲड. विलास रामटेके यांनी अण्णाभाऊंचे साहित्य विज्ञाननिष्ठ, वास्तववादी आणि अंधश्रद्धाविरोधी असल्याचे प्रतिपादन केले.

प्रास्ताविकात प्रा. विलास कटारे यांनी समाजातील भेदभावाची मानसिकता बदलण्याची गरज व्यक्त केली. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके यांनी केले, तर आभार प्रदर्शन उद्योजक मिलिंद बागुल यांनी केले. कार्यशाळेला गीता बावत व कारभारी वाघमारे यांचीही विशेष उपस्थिती होती.

### जम्मू-काश्मीरच्या बारामुल्लाम ध्ये दहशतवाद्यांच्या दोन साथीदारांना अटक; शस्त्रे आणि दारूगोळा जप्त

श्रीनगर : सुरक्षा दलांनी जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला आणि पुलवामा जिल्ह्यांतून दोन 'ओव्हरग्राउंड वर्कर्स'ना म्हणजेच दहशतवाद्यांना रसद पुरवणाऱ्या साथीदारांना अटक केली आहे. त्यांच्याकडून शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. त्यांच्या 'हँडलर्स'ची (सूत्रधारांची) ओळख पटवण्यासाठी पोलीस त्यांची चौकशी करत आहेत. अधिकाऱ्यांनी रविवारी ही माहिती दिली.

एक मोबाईल फोन जप्त केला : अधिकाऱ्यांनी सांगितले की, एजाज अहमद गनाई या आरोपीला पोलीस, लष्करी आणि निमलष्करी दलांच्या संयुक्त पथकाने मध्यरात्री बारामुल्लामधील शिरी भागातील गोरीवान येथे एका फिरत्या वाहन तपासणी नाक्यावर पकडले. सुरक्षा दलांनी त्याच्याकडून एक पिस्तूल, एक मॅगझिन, १० जिवंत काडतुसे (९ मिमी) आणि एक मोबाईल फोन जप्त केला असून, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका स्वतंत्र कारवाईत सुरक्षा दलांनी पुलवामा जिल्ह्यातील राजपोरा भागात तपासणीदरम्यान आणखी एका साथीदाराला अटक केली.इतर व्यक्तींची ओळख पटवण्याचाही प्रयत्न : तौसीफ अहमद दार याच्याकडून हँड ग्रेनेड आणि आक्षेपार्ह पोस्टर्स जप्त केल्यानंतर त्याला अटक करण्यात आलीय. त्याच्यावर कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पोलीस त्याच्या नेटवर्कमध्ये सामील असलेल्या इतर व्यक्तींची ओळख पटवण्याचाही प्रयत्न करत आहेत. विशेष म्हणजे जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादाला खतपाणी घालण्यात दहशतवाद्यांच्या साथीदारांची भूमिका महत्त्वाची असते, असे सुरक्षा दलांचे मानणे आहे; त्यामुळेच अशा साथीदारांना लक्ष्य केले जात आहे.

### एक-दोन नव्हे, तब्बल 13 बिबटे आणि तीन अस्वलांना ठार मारण्याचे आदेश

**नागपूर/प्रतिनिधी :** उत्तराखंडमध्ये वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षामुळे राज्य सरकारने कठोर पाऊल उचलत १३ बिबटे आणि तीन अस्वलांना गोळ्या घालण्याचे आदेश दिले आहेत. संबंधित प्राण्यांनी वारंवार मानवी वस्त्यांमध्ये घुसून हल्ले केल्याने त्यांना 'मानवी जीवितासाठी धोकादायक' घोषित करण्यात आले आहे. भूल देऊन पकडण्याचे अनेक प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर अखेर हा निर्णय घेण्यात आल्याचे वनविभागाने स्पष्ट केले.

वनविभागाच्या आकडेवारीनुसार, राज्यात सध्या मानव-वन्यजीव संघर्षाशी संबंधित ११७ गंभीर प्रकरणे हाताळली जात आहेत. त्यामध्ये ८९ बिबटे, २१ वाघ आणि आठ अस्वलांचा समावेश आहे. या प्राण्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष पथके, ट्रॅप कॅमेरे, पिंजरे आणि ड्रोनचा वापर केला जात असून अनेक भागांत वन कर्मचाऱ्यांची गस्त वाढविण्यात आली आहे.

### आझाद मैदानावरील आंदोलनात दिलेल्या आश्वासनांची तत्काळ पूर्तता करा

#### शिक्षक समन्वय संघाच्या वतीने पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांना निवेदन!

**बीड/प्रतिनिधीः** मुंबई येथील आझाद मैदानावर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी पार पडलेल्या धरणे आंदोलनादरम्यान दिलेल्या आश्वासनांची तत्काळ पूर्तता करण्यात यावी, या मागणीचे निवेदन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने खंडेराव जगदाळे सर यांच्या आदेशावरून जितेंद्र डोंगरे आणि आत्माराम वाव्हळ यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांना दिले.



राज्यातील विना अनुदानित अंशतः अनुदानित शाळेच्या वाढीव टप्पा अनुदानासाठी या शाळेत काम करणा-या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी विविध मागण्यांसाठी २२ जून २०२६ पासून आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले होते. १० जुलै २०२६ रोजी ग्रामविकास व क्रीडा मंत्री तथा संकटमोचक गिरीष महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आंदोलनाला भेट देऊन विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन दिले होते. आझाद मैदानावरील आंदोलनात शासनाकडून दिलेल्या शब्दाची व आश्वासनांची त्वरित अंमलबजावणी व्हावी आणि शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांवर मंत्रिमंडळात त्वरित बैठक घेऊन न्याय द्यावा या मागणीचे निवेदन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांना द्या असे शिक्षकांचे नेते शिक्षक संघर्ष योद्धा खंडेराव जगदाळे सर यांनी आदेशीत केले होते. शिक्षक नेते खंडेराव जगदाळे सरांच्या या आदेशा नुसार शिक्षक समन्वय संघाच्या वतीने जितेंद्र डोंगरे आणि आत्माराम वाव्हळ यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांना दिले. यावेळी सुनित्रेताई पवार यांनी यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन निर्णय घेणार असल्याचे आश्वासन जितेंद्र डोंगरे आणि आत्माराम वाव्हळ यांना दिले. या वेळी त्यांच्या समवेत शिक्षक आमदार विक्रम काळे हे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी दिलेल्या आश्वासनामुळे विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेचा प्रश्न मार्गी लागेल अशी आशा पल्लवीत झाली असून शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांत आनंदाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

### महिन्याभरापूर्वी आई गेली अनब मुलावरही काळाचा घाला! मिरवणुकीत भरधाव ट्रकने चिरडलं

**नाशिक/प्रतिनिधी :** अवघ्या महिन्याभरापूर्वीच डोक्यावरचं आईचं छत्र हरपलं होतं, त्या दुःखातून सावरत २४ वर्षांचा तरुण कसंतरी जगण्याची उमेद धरत होता. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीच्या मिरवणुकीत उत्साहाने सहभागी झाला होता. पण, नियतीच्या मनात काही वेगळंच होतं. या तरुणावरही काळानं झडप घातली आणि क्षणात सगळं संपलं. मिरवणुकीचा आनंद काही क्षणांत किंकाळ्यांमध्ये बदलला आणि २४ वर्षांच्या तरुणीने जागीच जीव सोडला.शनिवारी सायंकाळी नांदगावात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अत्यंत उत्साहात मिरवणूक काढण्यात आली होती. गांधीनगर येथील सुनील साठे हा २४ वर्षीय तरुणही या मिरवणुकीत मोठ्या उत्साहाने सहभागी झाला होता. मिरवणूक नगरपरिषदेच्या जलकुंभाजवळील येवला रस्त्यावरून जात असताना, तिथे असलेल्या स्पीड ब्रेकरवरुन येवल्याच्या दिशेने जाणारा हरियाणा पासिंगचा एक ट्रक जात होता. याच वेळी अचानक सुनील गतिरोधकाजवळ चालत्या ट्रकच्या चाकाखाली सापडला. काही समजायच्या आत सुनीलचा ट्रकखाली चिरडून मृत्यू झाला. हा भयानक प्रकार पाहताच मिरवणुकीत गोंधळ उडाला, परिसरात शोककळा पसरली आहे.

कुटुंब एका दुःखातून सावरत नव्हतं तोच आता मुलगाही गमावल्याने कुटुंबियांनी टाहो फोडला आहे. सुनीलच्या अपघाती निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरताच परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. सर्वात भीषण आणि मन हेलावून टाकणारी गोष्ट म्हणजे, अवघ्या महिनाभरापूर्वीच सुनीलच्या आईचे निधन झाले होते. आईच्या जाण्याचे दुःख कुटुंब पचवत असतानाच, आता घराबाहेर पडलेला २४ वर्षांचा जवान मुलगा थेट तिरडीवरूनच परत आल्याने साठे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

जयंतीच्या बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि गर्दी बाजूला केली. याप्रकरणी नांदगाव पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सेवाभावी संस्थेकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**केज/प्रतिनिधी :** साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सेवाभावी संस्था, नायगाव (ता. केज, जि. बीड) यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत नायगाव व धनेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासह खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळावी, तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा समाजापर्यंत पोहोचविण्यासोबतच शिक्षण, समाजसेवा आणि सामाजिक समतेच्या कार्यात संस्था सातत्याने कार्यरत राहणार असल्याचे मत संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय मुजमुले यांनी बोलताना व्यक्त केले.




यावेळी संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय मुजमुले,नायगाव शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब गोरे, मांजरा प्रकल्प धनेगाव शाळेचे मुख्याध्यापक संतोष शेळके,सहशिक्षक कुणाल आयवळे,संस्थेचे उपाध्यक्ष महादेव मुजमुले, यांच्यासह अंगणवाडी शिक्षिका अभिलाषा मुजमुले, वर्षा पोटभरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### प्राचार्य डॉ.बाबासाहेब गोरे याचा सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील बनसारोळा येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले प्राध्यापक डॉ. बाबासाहेब गोरे हे आपल्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय शैक्षणिक सेवेनंतर दिनांक २ जुलै २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीमुळे शिक्षण क्षेत्रातील एका समर्पित आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापकाच्या कार्याचा गौरवपूर्ण अध्याय पूर्ण झाला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये या ध्येयाने प्रेरित होऊन डॉ. गोरे यांनी बनसारोळ्यासारख्या ग्रामीण परिसरात महाविद्यालय उभारण्यासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे अनेक सर्वसामान्य कुटुंबांतील युवक-युवतींना गावाजवळच उच्च शिक्षणाची




संधी उपलब्ध झाली. शिक्षणाचा दीप ग्रामीण भागात पोहोचवून असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे कार्य त्यांनी निष्ठेने केले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि संस्कार यांचा वारसा रुजविण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध क्षेत्रांत यश संपादन करून समाजात आपले स्थान निर्माण केले आहे.

प्रा. डॉ. बाबासाहेब गोरे यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी विविध सामाजिक शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर सर्जेराव निमसे माजी कुलगुरु स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड,लखनऊ विद्यापीठ लखनऊ, ना.बाबासाहेब पाटील सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, खा. बजरंग बप्पा सोनवणे लोकसभा खासदार, बीड, आ. सतीश चव्हाण पदवीधर आमदार मराठवाडा विभाग, आमदार केज विधानसभा आ. नमिताताई मुंदडा,डॉ. देवानंद शिंदे माजी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व माजी अध्यक्ष एम.पी.एस. सी.,आ. विक्रम काळे शिक्षक आमदार, मराठवाडा विभाग, रमेश आडसकर चेअरमन, अंबा सहकारी साखर कारखाना लि. अंबाजोगाई, मधुकरराव गायकवाड, माजी कुलगुरु, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड-अध्यक्ष सेवापूर्ती गौरव सोहळा संयोजन समिती सहकारी, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य दीर्घायुष्य आणि निरामय जीवनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

## एअर इंडिया इमारतीच्या नूतनीकरणात लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य द्यावे : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या विविध शासकीय विभागांच्या गतिमान आणि सुलभ कार्यपद्धतीच्या दृष्टीने एअर इंडिया इमारतीचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. नूतनीकरण करताना लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले.

वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एअर इंडिया इमारतीसंदर्भातील सादरीकरण करण्यात आले, त्यावेळी त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मुख्य सचिव यांनी याबाबत संबंधितांची एक बैठक घेऊन सविस्तर चर्चा करुन सुयोग्य नियोजन करावे. विविध शासकीय विभागांतील कोणत्या विभागांचे स्थलांतर एअर इंडियाच्या नूतनीकरण इमारतीत करणे हे प्रशासकीय आणि नागरिकांच्या दृष्टीने सोयीचे ठरेल हे पाहावे. या ठिकाणी प्रशासकीय कार्यपद्धती ही सुलभ आणि लोकाभिमुख होईल यास प्राधान्य द्यावे. त्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, विकास चंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव (विशेष चौकशी अधिकारी) पंकज कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता प्रज्ञा वाळके; तसेच अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी, वास्तुविशारद उपस्थित होते. संभाव्य नूतनीकरण आराखड्यांचे सादरीकरण संबंधित वास्तुविशारदांद्वारे करण्यात आले.

## आंब्याच्या बागेत ओढणीने गळफास अनब... २ चिमुकल्या बहिणींच्या मृत्यूचं ते काळं सत्य अखेर समोर!

लखनऊ : ज्या हातांनी कौतुकाने कुरवाळायला हवे होते, ज्या बापाच्या कुशीत सुरक्षिततेचा निवारा मिळायला हवा होता, त्याच नराधम बापाने आणि भावाने स्वत:च्या दोन निष्पाप चिमुकल्यांची अत्यंत निघृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. खोट्या कौटुंबिक प्रतिष्ठेपोटी अवघ्या १३ आणि ११ वर्षांच्या दोन लहान बहिणींचे हसते-खेळते आयुष्य क्रूरतेने संपवण्यात आले. हत्या केल्यानंतर पोलिसांनी संशय येऊ नये म्हणून आत्महत्येचा खोटा बनाव रचत रात्रीच्या अंधारात मृतदेह पुरण्यात आले होते. मात्र, कायद्याच्या तावडीतून हे गुन्हेगार सुटू शकले नाहीत; अलाहाबाद उच्च न्यायालयाने या प्रकरणात नराधम बाप आणि भावाची जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवत मोठा निर्णय दिला आहे.

ही सुन्न करणारी घटना १६ ऑक्टोबर २०१६ रोजी उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील एका गावात घडली होती. घटनेच्या दिवशी मुख्य आरोपी राम प्रसाद याने १३ वर्षांची दयावती आणि ११ वर्षांची धर्मवती या आपल्या दोन निष्पाप मुलींना घरातून बाहेर घालवून दिले. त्यानंतर काहीच वेळात या दोन्ही मुलींनी आंब्याच्या बागेत ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची आवई कुटुंबाने उठवली. पोलिसांचा हस्तक्षेप टाळण्यासाठी आणि आपले पाप लपवण्यासाठी कुटुंबाने कोणालाही न कळवता रात्रीच्या अंधारात गंगा नदीच्या खडार भागात दोन्ही चिमुकल्यांचे मृतदेह गाडून टाकले.

कुटुंब ज्या घाईघाईने अंत्यसंस्कार उरकण्याचा प्रयत्न करत होते, त्यावर गावातील माजी सरपंचांना मोठा संशय आला. त्यांनी कोणतीही वेळ न घालवता या प्रकरणाची माहिती स्थानिक पोलिसांना दिली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ जिल्हाधिकाऱ्यांची विशेष परवानगी मिळवली आणि गंगा नदीच्या पात्रात पुरलेले दोन्ही मृतदेह बाहेर काढले. जेव्हा या मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले, तेव्हा डॉक्टरांच्या अहवालाने सर्वांनाच हादरवून सोडले. मुलींचा मृत्यू आत्महत्येमुळे नाही, तर त्यांची मारहाण करून गळा आवळून हत्या करण्यात आली असल्याचे अहवालात स्पष्ट झाले, आणि नराधम बाप-भावाचा बनाव चव्हाट्यावर आला.

या प्रकरणात २०१९ मध्ये ट्रायल कोर्टाने (सत्र न्यायालय) आरोपी वडील राम प्रसाद आणि भाऊ चंद्र भान या दोघांनाही दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरोधात आरोपींनी अलाहाबाद उच्च न्यायालयात अपील केले होते. मात्र, न्यायमूर्ती जे. जे. मुनीर आणि न्यायमूर्ती विनय कुमार द्विवेदी यांच्या खंडपीठाने आरोपींचे सर्व युक्तिवाद फेटाळून लावले.

''मुलींच्या मृत्यूनंतर पोलिसांना कोणतीही माहिती न देणे, पंचनामा करू न देणे आणि रात्रीच्या अंधारात मृतदेह गाडणे हे आरोपींचे संशयास्पद वर्तन आणि पुरावे नष्ट करण्याचा स्पष्ट प्रयत्न दर्शवते. हे कृत्य केवळ आणि केवळ खोट्या कौटुंबिक प्रतिष्ठेसाठी (प्दहदली ख्न्त्हु) करण्यात आले आहे.''

अलाहाबाद उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निर्णय कायम ठेवल्याने आता नराधम बापाला आणि भावाला आयुष्याची उरलेली वर्षे तुरुंगाच्या गजांआडच घालवावी लागणार आहेत. कौटुंबिक प्रतिष्ठेच्या नावाखाली निष्पाप चिमुकल्यांचा बळी घेणाऱ्या अशा नराधमांना मिळालेली ही शिक्षा समाजात एक कठोर संदेश देणारी ठरेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

## ...तर आरएसएस मध्ये मोदींनी आपली माणसं पेरली आहेत, राऊतांचं विधान; मोहन भागवतांना माझं आव्हान आहे की...

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाहक अतुल लिमये यांनी जेन झी चळवळीसंदर्भात केलेल्या विधानावरुन नवीन वादाला तोंड फुटलं आहे. विशेषत: कॉकरोच जनता पार्टीच्या नीट पेपरफुटीविरोधी आंदोलनाबद्दल बोलताना ते 'देशविरोधी' आणि 'संविधानविरोधी' असल्याचे म्हटले लिमये यांनी म्हटले आहे. २ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना संबोधित करताना लिमये यांनी कॉकरोच जनता पार्टीच्या जंतर-मंतरवरील आंदोलनावर टीका केली.

### आंतरराष्ट्रीय न्याय दिन आणि जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या जनजागृती कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय न्याय दिन आणि जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय आणि जिल्हा वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४ विषयक जनजागृती कार्यक्रम पार पडला.

जिल्हा वकील संघाच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, जिल्हा सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. आर. निळेकर, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या विधी सल्लागार श्रीमती ए. आर. मेकले, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. शिवकुमार जाधव आणि ॲड. स्नेहा शिणगारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

भारतात स्त्रीला माता आणि शक्तीस्वरूप मानले जात असताना स्त्रीभ्रूणहत्येसारख्या घटना घडणे ही दुर्दैवी बाब आहे. स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे ही काळाची गरज असल्याचे विधी सेवा प्राधिकरणचे सचिव श्री. गिरवलकर यांनी यावेळी नमूद केले.

श्रीमती ए. आर. निळेकर आणि श्रीमती ए. आर. मेकले यांनी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्यातील तरतुदी, नियम, तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया, पंचनामा करण्याची पद्धत तसेच कायद्याच्या अंमलबजावणीतील महत्त्वाच्या बाबी याविषयी सविस्तर माहिती दिली.

ॲड. शिवकुमार जाधव यांनी गर्भलिंग निवड प्रतिबंध कायदा, आंतरराष्ट्रीय न्याय दिन आणि वाढत्या लोकसंख्येच्या आव्हानांबाबत समाजात व्यापक जनजागृती होण्याची आवश्यकता अधोरेखित केली. ॲड. स्नेहा शिणगारे यांनी आंतरराष्ट्रीय न्याय दिनाचे महत्त्व, सर्वसमावेशक न्यायव्यवस्थेची भूमिका तसेच आरोग्य, लोकसंख्या नियंत्रण आणि त्याचे सामाजिक परिणाम यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे उपमुख्य न्यायरक्षक ॲड. जी. जे. मिटकरी यांनी केले, तर आभार ॲड. मंजुश्री शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. लहूजी चामे, सचिव ॲड. गुरुप्रसाद येरटे, सहसचिव ॲड. सिद्धेश्वर धायगुडे, कोषाध्यक्ष ॲड. नितीन राठोड यांच्यासह विधीज्ञ, अधिकार मित्र आणि पक्षकार उपस्थित होते.

## वीरशैव लिंगायत समाज, लातूरच्यावतीने मनपा प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन



**लातूर/प्रतिनिधी :** वीरशैव लिंगायत समाज, लातूर यांच्या वतीने लातूर महानगरपालिकेचे आयुक्त, महापौर व विरोधी पक्षनेते यांना समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत निवेदन देण्यात आले. यामध्ये विशेषत्वाने कन्हेरी चौक येथील कैलासधाम स्मशानभूमीचा प्रश्न आणि माजी केंद्रीय गृहमंत्री कै. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मारकाच्या उभारणीची मागणी प्राधान्याने करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कन्हेरी चौक येथील वीरशैव लिंगायत समाजासाठी राखीव असलेल्या कैलासधाम स्मशानभूमीला जवळपास ३० वर्षांचा कालावधी लोटला असूनही तेथे अद्याप अंत्यसंस्काराची प्रक्रिया सुरू होऊ शकलेली नाही. या जागेची देखभाल करण्याचा ताबा समाजाकडे असला तरी विविध प्रशासकीय अडचणींमुळे तेथे अंत्यविधी करण्यास स्थगिती देण्यात आली आहे. आजघडीला लातूर शहरात वीरशैव लिंगायत समाज बांधवांची संख्या लक्षणीय वाढली आहे. वाढत्या संख्येच्या तुलनेत स्मशानभूमीचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला आहे. याकडे मनपा प्रशासनाने गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. समाजातील नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, हा प्रश्न तातडीने सोडवून स्मशानभूमी समाजासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच लातूरचे वैभव आणि देशाचे माजी गृहमंत्री कै. शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मारक लातूर महानगरपालिकेच्या प्रांगणातच उभारण्यात यावे, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली. शिवराज पाटील यांनी नगरपरिषदेचे सदस्य व अध्यक्ष, लातूरचे आमदार, महाराष्ट्र शासनातील मंत्री, लोकसभेचे खासदार, लोकसभेचे सभापती, देशाचे गृहमंत्री तसेच पंजाब राज्याचे राज्यपाल अशा विविध महत्त्वाच्या पदांवर कार्य करून लातूरचे नाव देशपातळीवर पोहोचवले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्यांचे कार्य पुढील पिढ्यांना प्रेरणादायी ठरावे यासाठी स्मारक महापालिकेच्या प्रांगणातच उभारण्यात यावे. महाराष्ट्र शासन स्मारकासाठी निधी देण्यास तयार असून पुतळा अन्यत्र हलविण्याचा प्रयत्न झाल्यास समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण होऊ शकते, असेही निवेदनात म्हटले आहे. महापालिका प्रशासनाने समाजाच्या भावना लक्षात घेऊन कैलासधाम स्मशानभूमीचा प्रश्न आणि शिवराज पाटील चाकूरकर स्मारकाचा प्रस्ताव तातडीने मंजूर करून समाजाला न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी उमाकांत कोरे, सुनील भीमपूरे, बालाजी पिंपळे, सुहास आष्टगे, अमित पाटील, बंडप्पा जवळे, मन्मथ चिकले, भालचंद्र दानाई, लहू खरोळे, सतीश जोंधळे, शंकर सुगरे, सूर्यकांत हत्ते यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

## ६ महिन्यांपूर्वी वडिलांचा मृत्यू, आता मुलगाही नियतीने गिळला, आई-बहिणीचा आधार हरपला, हिंगोलीतील मन हेलावणारी घटना

**हिंगोली/प्रतिनिधी :** रस्त्यावर नादुरुस्त अवस्थेत उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून दुचाकी आदळल्याने झालेल्या भीषण अपघातात दोन चुलत भावांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. हा अपघात सेनगाव ते रिसोड मार्गावरील वाढोणा शिवारात रविवारी रात्री उशिरा घडला. नादुरुस्त उभ्या असलेल्या ट्रकला मागच्या बाजुला कोणतेही रिफ्लेक्टर नव्हते, तसेच इंडिकेटरही बंद होते, यामुळे हा अपघात घडल्याचं बोललं जात आहे.

या अपघातात सुजीत बांगर (वय २७) आणि नीलेश बांगर (वय २५) या दोन तरुण चुलत भावांचा मृत्यू झाला आहे. हे दोघेही सेनगाव तालुक्यातील पानकनेरगाव येथील रहिवासी होते. मिळालेल्या माहितीनुसार, पानकनेरगाव येथील २०० पेक्षा अधिक तरुण कामाच्या निमित्ताने विदर्भातील रिसोड येथे रोज ये-जा करतात. सुजीत आणि नीलेश हे दोघे चुलत भाऊदेखील दररोज कामासाठी रिसोडला जात असत. नेहमीप्रमाणे शनिवारी ते दुचाकीने काम आटोपून रात्रीच्या सुमारास गावाकडे परत येत होते.

## मत्स्यपालकांसाठी आधुनिक तंत्रज्ञानावरील प्रशिक्षण उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मत्स्यपालकांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार, कौशल्य विकास आणि जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने ''आधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक जाळी व बोटी आणि मत्स्य हाताळणी व विपणन''या विषयावरील एकदिवसीय जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

महाराष्ट्र शासनाचे मत्स्यव्यवसाय आयुक्त यांच्या निर्देशानुसार सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, लातूर तथा दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्राणिशास्त्र व मत्स्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे पदाधिकारी, पीएमएमएसवाय प्रकल्पधारक मत्स्यशेतकरी आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे होते. प्राणीशास्त्र व मत्स्य विभागाचे विभागप्रमुख डॉ. रवी सोळुंके, शासनाच्या मत्स्यव्यवसायविभागाच्यासहाय्यक आयुक्त तेजस्विनी करळे यांनी आधुनिक मत्स्यव्यवसायातील संधी, शाश्वत उत्पादन, कौशल्य विकास आदींसह शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली.

तांत्रिक सत्रात मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर येथील प्रा. डॉ. सोमनाथ यादव यांनी बायोफ्लॉक व रीसर्क्युलेटरी ॲक्काकल्चर सिस्टीम (आरएएस) तंत्रज्ञानावर मार्गदर्शन केले. वैज्ञानिक मत्स्यपालन, उत्पादनवाढ, खर्च नियंत्रण आणि उद्योजकतेच्या संधी याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.

सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी नि. मा. साळुंके यांनी माशांची शास्त्रीय हाताळणी, शीतसाखळी, काढणीनंतरचे नुकसान टाळण्याचे उपाय, मत्स्य विपणन आणि मूल्यवर्धन याविषयी मार्गदर्शन केले.

हमजा सय्यद यांनी मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना, जलाशयातील केज कल्चर, आधुनिक मत्स्य जाळी व बोटी तसेच विविध अनुदान योजनांची माहिती देत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले.प्रशिक्षणादरम्यान उपस्थितांनी विविध विषयांवरील शंकांचे निरसन करून घेतले.

## इथेनॉल मिश्रित पेट्रोल विरोधात युवक काँग्रेस आक्रमक; नितीन गडकरींच्या घरावर युवक काँग्रेसचा जनआक्रोश मोर्चा

**नागपूर/प्रतिनिधी :** इथेनॉल मिश्रित पेट्रोल, शिक्षण क्षेत्रातील समस्या, विद्यार्थ्यांचे प्रश्न, वाढती बेरोजगारी आणि जनतेच्या विविध मागण्यांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी नागपूर शहर युवक काँग्रेसच्या आज वतीने सोमवारी जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आलं. मोर्चा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर येथील निवासस्थानाकडे जात असताना पोलिसांनी बॅरिकेड्स लावून आंदोलकांना अडवलं. यावेळी पुढे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी रोखल्याने काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं.

पोलिसांनी आंदोलकांना बॅरिकेड्सपाशीच थांबवल्यामुळे कार्यकर्त्यांनी तीव्र घोषणाबाजी करत निषेध नोंदवला. त्यामुळे काहीवेळ आंदोलनस्थळी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. मात्र, पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात आली. या आंदोलनातून इथेनॉल मिश्रित पेट्रोलच्या धोरणासह शिक्षण, विद्यार्थी आणि बेरोजगारीच्या प्रश्नांवर केंद्र सरकारने तातडीने भूमिका घ्यावी, अशी मागणी युवक काँग्रेसने केली. जनआक्रोश मोर्चादरम्यान युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. प्रश्न आमचे, उत्तर तुमचे, आश्वासन नाही, हिशेब द्या तसंच धर्मेंद्र तो झांकी है, गडकरी अभी बाकी है अशा घोषणा देत आंदोलकांनी निषेध व्यक्त केला.


आंदोलकांनी आक्रमकपणे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानाकडे कूच करण्याचा प्रयत्न केल्यानं काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं. आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी बॅरिकेड्स उभारले होते. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये धक्काबुक्की झाली.

शेकडो आंदोलक ताब्यात : जनआक्रोश मोर्चाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थान परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. परिस्थिती चिघळण्याची चिन्हे दिसताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत शेकडो आंदोलकांना ताब्यात घेतलं.

### लातूर येथील सीआरपीएफ रंगरूट प्रशिक्षण केंद्रात

# २ हजार रोपांचे वृक्षारोपण





**लातूर/प्रतिनिधी :** येथील केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) रंगरूट प्रशिक्षण केंद्रात पोलीस उपमहानिरीक्षक तथा प्राचार्य अमीरुल हसन अंसारी यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाअंतर्गत सुमारे २ हजार रोपांची लागवड करण्यात आली.

लागवड करण्यात आलेल्या रोपांमध्ये स्थानिक प्रजातींची फळझाडे, सावली देणारी वृक्ष तसेच औषधी वनस्पतींचा समावेश होता.

यावेळी उपस्थित अधिकारी आणि जवान प्रशिक्षार्थींना मार्गदर्शन करताना अमीरुल हसन अंसारी म्हणाले, ''आपण केवळ राष्ट्राच्या सुरक्षेसाठीच नव्हे, तर पर्यावरणाच्या संरक्षणासाठीही कटिबद्ध आहोत. आज लावलेली झाडे भविष्यातील पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा ठरतील.'' या कार्यक्रमाला कमांडंट पारसनाथ, राजपत्रित अधिकारी, जवान तसेच सुमारे १ हजार ७०० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करण्याची शपथ घेतली.

यापूर्वीही सीआरपीएफ आरटीसी, लातूरतर्फे कॅम्प परिसर आणि आजूबाजूच्या भागात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले आहे. त्यामुळे हा परिसर विविध पक्षी व वन्यजीवांसाठी सुरक्षित अधिवास म्हणून विकसित होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.